जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक १९.१०.२०२५**

अवैध गुटखा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थाची बेकायदेशिर वाहतूक करणाऱ्या आरोपीस अटक

गुजरात राज्यातून आयशर टेम्पो मधून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थाची बेकायदेशीररित्या विक्री केली असल्याबाबत गुन्हे शाखा, घटक ३, कल्याणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे यांना बातमीदारा मार्फत खात्रीशिर बातमीच्या आधारे गुन्हे शाखा, घटक ३ चे अधिकारी व अंमलदार यांचे पथकाने दिनांक १७/१०/२०२५ रोजी ०५.३० वाजता गांधारी ब्रिज चौक, कल्याण पश्चिम या ठिकाणी सापाळा रचला असला आरोपी धनराज रामगोपाल स्वामी, ता.लक्ष्मणगढ, जि.शिकर, राजस्थान हा त्याचे ताब्यातील आयशर टेम्पो मधून प्रतिबंधीत गुटखा व तंबाखूजन्य पदार्थाची बेकायदेशीररित्या वाहतूक करताना मिळून आला त्याचेकडे एकुण ८७,३७,४७२/- रूपये किंमतीचा अवैध गुटखा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ हस्तगत करण्यास पोलीस पथकास यश आले.

सदर बाबत आरोपी नामे धनराज रामगोपाल स्वामी याचे व चौकशीत निष्पन्न पाहिजे आरोपी याचे विरोधात खडकपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं ७३८/२०२५ बीएनएस २०२३ चे कलम १२३,२२३,२७४,२७५,३(५) सह अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ मधील २६(२)(I), २७(१) सह वाचन ३(१)(ZZ)(IV) शिक्षा कलम ५९(३) तसेच २६(२),(IV),२७(३) (d),२७(३)(e) सह वाचन ३०(२)(a) व मा.अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसुचना क्रमांक अ.सु.मा. अ/अधिसुचना ४११/२०२५/०७, दिनांक ०६/०७/२०२५ ची अवज्ञा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हाचा तपास पोउपनि/विनोद पाटील, युनिट ३, कल्याण हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त श्री.अमरसिंह जाधव, गुन्हे, ठाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.शेखर बागडे, गुन्हे शोध - १, गुन्हे, ठाणे, यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट ३, कल्याणचे वपोनिरी/अजित शिंदे, सपोनि/सर्जेराव पाटील, पोउपनि/विनोद पाटील, किरण भिसे, सपोउपनि/दत्तराम भोसले, बालाजी शिंदे, पोहवा/बोरकर, सुधीर कदम, विजय जिरे, प्रशांत वानखेडे, सचिन भालेराव, गोरक्षनाथ पोटे, विलास कडु, आदिक जाधव, पांडुरंग भांगरे, उल्हास खंदारे, सचिन कदम, पोना/प्रविण किनरे, दिपक महाजन, पोअं/मिथुन राठोड, सतिश सोनावणे, गुरूनाथ जागर, विनोद चन्ने, गणेश हरणे, गोरक्ष शेकडे यांनी केलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर